CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २४८ वा ▶ मंगळवार दि. ४ जुलै २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

## अजित पवारांचा फुटीर गट पक्ष नव्हे : आव्हाड



**मुंबई ।** अजित पवारांच्या फुटीर गटाला पक्ष म्हणून मान्यता नाही. त्यांच्याकडे फक्त विलीन होण्याचा पर्याय आहे, असा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी दिलेल्या निकालाचे दाखले देत अजित पवार यांच्या दाव्यातली हवा काढून टाकली. अजित पवार, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांची पत्रकार परिषद झाल्यानंतर तातडीने जितेंद्र आव्हाड बोलले. तसेच अजित पवार यांनी केलेल्या नियुक्त्या चुकीच्या असल्याचा दावाही त्यांनी केला.

## न्यूज कॉलम

### आगार उपव्यवस्थापक महिलेस शिवीगाळ

**नाशिक ।** नो पार्किंग मध्ये लावलेली दुचाकी काढून घेण्याचे सांगितले असता राग आलेल्या इसमाने आगार उपव्यवस्थापक महिलेस शिवीगाळ केली. याप्रकरणी सदर इसमाविरूध्द शिंदखेडा पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. शिंदखेडा आगार उपव्यवस्थापक महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, दि.२ जुलै रोजी दुपारी सव्वातीन वाजेच्या सुमारास शिंदखेडा बसस्थानक आवारात नो पार्किंगमध्ये एका इसमाने एम.एच.१८/ए.एम.२९८१ क्रमांकाची दुचाकी लावली होती. सदर दुचाकी त्यास काढून घेण्याचे सांगितले.

### गुरांची वाहतूक; दोघांविरूद्ध गुन्हा

**धुळे ।** मुंबई-आग्रा महामार्ग क्रमांक तीनवरील चाळीसगाव चौफुलीवरून एका ट्रकमधून होणारी गुरांची वाहतूक चाळीसगावरोड पोलिसांनी उघड केली. कारवाईत पाच लाख ८६ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. देवेंद्र तायडे यांच्या फिर्यादीनुसार चाळीसगाव चौफुलीवर ट्रक (एमएच १८, एए १२६८) थांबविला असता वाहनात कत्तलीच्या उद्देशाने गुरांची वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले.

# १५ ऑगस्ट पर्यंत एक दिवसाआड पाणी न दिल्यास १६ ऑगस्टला जनआक्रोश मोर्चा

### मनपा आयुक्तांना अल्टीमेटम देत आ. शाह यांच्या उपोषणाची सांगता

**धुळे । प्रतिनिधी**

उपोषण स्थळी आयुक्त देविदास टेकाळे, उपायुक्त विजय सनेर,तहसीलदार पाटील व इतर अधिकारी यांनी भेट देवून आ.फारुख शाह यांचेशी चर्चा केली. प्रशासनाने दिलेली आश्वासने पूर्ण करण्याबाबत अटी शर्ती घालत आ. फारुख शाह यांनी आपले उपोषण सोमवारी आयुक्त देविदास टेकडीच्या विनंतीनंतर थांबविले. एक दिवसाआड पाणीपुरवठा १५ ऑगस्ट पासून करण्यात येईल. न झाल्यास १६ ऑगस्ट रोजी मनपा वर जनआक्रोश मोर्चा काढून पालिका बंद करणार, वाढीव घरपट्टी बाबत प्रस्ताव तयार करून विशेष महसभेसमोर ठेवा, याबाबत विधानसभेत तारांकित प्रश्न मांडणार, बंद सार्वजनिक शौचालयांची देखभाल करणाऱ्या ठेकेदारांना नोटीस देवून तत्काळ काम सुरू करणेबाबत कार्यवाही करा, गुरुवारी शहरातील नाले सफाई कामांचा अधिकाऱ्यांनी सोबत येऊन पाहणी दौरा करा, या व इतर विषयांवर चर्चा होवून आयुक्त देविदास टेकाडे यांच्या हस्ते आ.शाह यांनी जलप्राशन करून उपोषणाची सांगता केली.

महापालिका नागरिकांना सुविधा देण्यात अपयशी ठरली आहे. कारण भाजपाचे जेवढे नगरसेवक आहेत, ते केवळ भ्रष्टाचार करुन आपली घरे भरण्याचे काम करत आहेत. त्यासाठी ते धुळेकरांना वेठीस धरत असून पठाणी वसूली करत आहेत. गतकाळात जेवढा भ्रष्टाचार भाजपेयींनी केला, त्यापेक्षा मोठा भ्रष्टाचार त्यांना करायचा आहे, त्यामुळेच अव्वाच्या सव्वा घरपट्टी आकारुन वसूली केली जात आहे. परंतु, आम्ही घरपट्टीची वाढ होऊ देणार नाही,




**आयुक्त टेकाडेंना यावेच लागले**

**आ. फारुख शाह यांनी मनपाच्या कारभाराविरोधात सुरु केलेले उपोषण मागे घ्यावे यासाठी प्रशासनाच्या वतीने उपायुक्त विजय सनेर, तहसीलदार पाटील व इतर अधिकाऱ्यांनी उपोषणस्थळी जाऊन आ. शाह यांना उपोषण थांबविण्याची विनंती केली. मात्र आपल्याला जबाबदार अधिकारी म्हणून आयुक्त टेकाडे यांच्याशीच चर्चा करायची आहे अशी भूमिका आ. शाह यांनी घेतली. त्यामुळे सोनेरी यांनी फोन केल्यावर आयुक्त देविदास टेकाडे उपोषणस्थळी दाखल झाले. आ. शाह यांनी आयुक्तांसमोर प्रश्नांची सरबत्तीच लावल्याने आयुक्तांना चांगलाच घाम फुटला होता.**

त्यासाठी शासनस्तरावर लढा द्यावा लागला तर त्यासही मी तयार असल्याचा पक्का निर्धार आ.फारुख शाह यांनी केला आहे.

आ.शाह यांनी काल (सोमवारी) घोषणेप्रमाणे मनपातील भ्रष्टाचार व अकार्यक्षम कारभाराविरोधात उपोषण सुरु केले; यावेळी ते बोलत होते. शहरात दहा-दहा दिवसाआड होणारा पाणीपुरवठा, वाढीव घरपट्टी, अनियमित कचरा संकलन, बंद असलेली सार्वजनिक शौचालये या मुद्द्यांना उपस्थित करत आ.शाह यांनी महापालिकेविरोधात रणशिंग फुंकले आहे. महापालिकेतील भ्रष्टाचार व अकार्यक्षम कारभाराविरोधात त्यांनी पाच दिवसांपुर्वीच उपोषणाचा इशारा दिला होता. त्यानुसार आ. शाह यांनी सोमवारी सकाळी उपोषणाला सुरवात केली. तथापि, आ.शाह यांनी उपोषणाचा इशारा दिल्यानंतर मनपा प्रशासनाने त्यांच्या मागण्यांसदर्भात खुलासे सादर करत उपोषण मागे घेण्याची विनंती केली होती. परंतु, सदर खुलासे हे दिशाभूल करणारे व धादांत खोटे असल्याचे सांगत आ.शाह यांनी उपोषणाचे अस्त्र उगारले. सोमवारी सकाळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांनी क्युमाईन क्लबजवळ उपोषण सुरु केले.

या उपोषण आंदोलनात आ.फारुख शाह यांच्या सोबत नगरसेवक नासिर पठाण, नगरसेवक सईद बेग, नगरसेवक मुक्तार अन्सारी, नगरसेवक आमिर पठाण, नगरसेवक गणी डॉलर, नजर पठाण, माजी नगरसेवक साजीद साई, डॉ.दिपश्री नाईक, प्यारेलाल पिंजारी, डॉ. शराफत अली, निजाम सैय्यद, कैसर अहमद, शोएब मुल्ला, डॉ.बापुराव पवार, इकबाल शाह, जमील खाटीक, सऊद सरदार, रिझवान अन्सारी, आसिफ मुल्ला, अनिस शाह, सुलेमान मलिक, हालिम शमसुद्दिन, सउद आलम, फैजल अन्सारी, जुबेर शेख, मुद्दसर शेख, माजीद पठाण, जावेद मिर्झा, फकिरा शाह, इब्राहीम खान, अफसर शाह, रफिक शाह, राजू लीडर, फातमा अन्सारी, मैमुणा अन्सारी, अकीला शेख आदी उपोषणात सहभागी झाले होते.

# भाजपा, मनपाच्या फुटलेल्या वायद्याप्रमाणे अक्कलपाडा पाईपलाईन व्हॉल्व सुरु होण्याआधीच फुटला : आनंद लोंढे

**धुळे । प्रतिनिधी**

अक्कलपाडा योजनेतून धुळे शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी टाकलेल्या मुख्य जलवाहिनीला काल मोठी गळती लागली. यात लाखो लीटर पाणी वाया गेले आहे. याविरोधात आज आझाद समाज पार्टीचे प्रदेश कार्याध्यक्ष आनंद लोंढे व समता समाज संघ जिल्हाध्यक्ष किरण गायकवाड यांनी गळती लागलेल्या ठिकाणी जावून सत्ताधारी भाजपाविरोधात आंदोलन केले.

यावेळी 'भाजपा धुळे यांच्या फुटलेल्या वायद्याप्रमाणे पाईपलाईन देखील फुटली, धुळेकरांना एकदिवसाआड पाणी कधी?' असे बॅनर झळकावून जोरदार घोषणाबाजीही करण्यात आली. अक्कलपाडा धरणातून हनुमान टेकडी जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाणी वाहून नेणारी मुख्य जलवाहिनी अचानक फुटली. व्हॉल्व नादुरुस्त झाल्याने ही गळती झाल्याचे सांगण्यात येत आहे. या गळतीमुळे तीव्र वेगाने पाणी हवेत ओसंडले. ही गळती मोराणे जवळील प्रतापनाना महाले बाजार समितीजवळ लागली होती. त्यामुळे संपूर्ण परिसर जलमय झाला. परिणामी, सुरत-नागपूर महामार्गावरुन जाणार्या वाहनांना तारेवरची कसरत करावी लागली. पाणी गळतीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर त्या ठिकाणी आझाद समाज पार्टीचे आनंद लोंढे, समता संघाचे किरण गायकवाड, मिलिंद खैरनार आदी कार्यकर्ते दाखल झाले. त्यांनी त्याठिकाणी बीजेपीविरोधी घोषणाबाजी करुन वायद्याप्रमाणे पाईपपाईन देखील फुटली असे बॅनर झळकाविले. तसेच या आशयाची पत्रकं गळती झालेल्या ठिकाणी फेकून सत्ताधार्यांचा तीव्र निषेध केला.

भाजपाच्या वायद्याप्रमाणे अक्कलपाड्याची पाईपलाईन फुटली आहे. त्यामुळे हजारो लीटर पाणी वाहून गेले. ठेकेदाराने कुठे व्हॉल्व टाकले आहे; हे त्यालाच माहित नाही. व्हॉल्व उघडे आहेत; त्यांना झाकणंही बसविण्यात आलेले नाहीत. या योजनेचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे. आधीच धरणात पाणी नाही. जनतेला आठ दिवसाआड पाणी मिळते. तेही अत्यंत घाणेरडं आणि दुषित पाणी असते. सत्ताधारी दरमहिन्याला महिन्याअखेर पाणी देणार असे सांगताहेत. सहा महिन्यांपासून तेच सुरु आहे. आता सत्ताधार्यांनी भुलथापा न देता, सत्य परिस्थिती सांगावी. अन्यथा धुळे मनपाची सत्ता सोडावी. जलवाहिनी फुटलेल्या ठिकाणी २० फुटाहून अधिक व्यासाचा खड्डा झालेला आहे. या रस्त्यावरुन शाळकरी मुलांच्या बसेस, एसटी , खाजगी वाहनं जातात. त्यामुळे मोठा अपघात झाल्यास बीजेपी प्रशासनावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. सत्ताधारी भाजपाचा निषेध केला.



**अक्कलपाडा योजनेचे 'ग्रहण'कधी सुटणार?**

**अक्कलपाडा पाणी योजनेला सत्ताधारी व मनपा प्रशासन देत असलेलया आश्वासनांच्या शापासह ठेकेदाराच्या निकृष्ट कामांचे लागलेले ग्रहण कधी सुटणार? हा प्रश्न धुळेकर जनतेला अजून किती काळ सतावेल हे आजही ठामपणे कुणी सांगू शकत नाही. कारण सत्ताधारी पाहणी करून आले की आश्वासन देतात. मनपा आयुक्त चाचण्या केल्याचे म्हणत काम शेवटच्या टप्प्यावर आहे असे सांगून वेळ मारून नेतात. धुळेकरांना हा मचिल्लमतमाखुफ्वा खेळ अजून किती दिवस पाहावा लागेल. पावसाळा सुरु होऊन देखील पाणीपुरवठ्याचे इतर जलस्त्रोत उपलब्ध असताना दहा दिवसाआड पाणी ही विचित्रता धुळे शहराच्या दृष्टीने फार दुर्दैवाची आहे.**

# प्रफुल्ल पटेल आणि सुनिल तटकरे यांची पक्षातून हकालपट्टी

### शरद पवारांचा मोठा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

पक्षविरोधी कारवाई केल्याचा ठपका ठेवत खासदार प्रफुल्ल पटेल आणि सुनिल तटकरे यांची पक्षातून हकालपट्टी करण्याचा निर्णय पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवारांनी घेतला आहे. या आधी खासदार सुप्रिया सुळे यांनी या दोघांवर कारवाई करावी अशी मागणी करत शरद पवारांना एक पत्र लिहिलं होतं.

अजित पवारांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली त्यावेळी राष्ट्रवादीचे खासदार प्रफुल्ल पटेल आणि सुनिल तटकरे हेदेखील उपस्थित होते. या दोन्ही खासदारांनी पक्षविरोधी कारवाई केल्याचा ठपका ठेवत त्यांच्यावर आता कारवाई करण्यात आली आहे. या दोघांचीही पक्षातून हकालपट्टी करण्यात आली असून पक्षाच्या रजिस्ट्रीमधून त्यांच्या नावाची नोंदणी रद्द करण्यात यावी असा आदेश पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी दिला आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी शरद पवार यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे की, राष्ट्रवादीच्या प्रफुल्लुल पटेल आणि सुनिल तटकरे या संसदेतील दोन खासदारांनी पक्षविरोधी कारवाई करत २ जुलै रोजी झालेल्या शपथविधीला उपस्थिती दाखवली होती. त्यानंतर या दोन्ही खासदारांनी माध्यमांसमोर त्यांची भूमिका मांडत पक्षाच्या नियमांचे उल्लंघन केलं आहे. पक्षाच्या या दोन खासदारांनी राष्ट्रवादी पक्षाची विचारसरणी बाजूला सारल्याचं स्पष्ट झालं आहे.

### शरद पवारांचा निर्णय लागू नसेल : प्रफुल्ल पटेल

**शरद पवार हेच पक्षाचे अध्यक्ष असतील असे अजित पवारांनी स्पष्ट केले. शरद पवार यांनी घेतलेला निर्णय लागू नसेल असे प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले. आमच्या या निर्णयाला बहुसंख्येने पाठिंबा देण्यात आलेला आहे. लोकशाहीत बहुमताने घेतलेला निर्णय कुणीही अवैध ठरू शकत नाही. वाद व्हावा अशी आमची इच्छा नाही. पण अजितदादांनी सांगितल्यानुसार काही वाद झाल्यास त्याचा अंतिम निर्णय निवडणूक आयोग घेऊ शकते. मात्र वाद होऊ नये अशी आमचा मनापासून प्रयत्न असेल असे प्रफुल्ल पटेल म्हणाले.**

**शरद पवारचं पक्षाचे अध्यक्ष : अजित पवार**

आमचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवारच असल्याचं सांगत अजित पवारांनी जितेंद्र आव्हाडांच्या विरोधी पक्षनेतेपदाच्या नियुक्तीला आक्षेप घेतला आहे. राष्ट्रवादी पक्ष आमच्यासोबत असून पक्षाच्या विकासासाठी आम्ही काम करणार असल्याचं अजित पवारांनी सांगितलं. रविवारी सुनिल तटकरेंची नेमणूक केली, त्यात काही निर्णय घेतले आहेत ते सांगितलेच. एकाला प्रतोद आणि विरोधी पक्षनेते नेमलेलं आहे. मात्र हे काम विधानसभा अध्यक्षांचं असतं. ज्याची संख्या जास्त असते त्याची नेमणूक करत असतात. मात्र आमच्या आमदारांमध्ये भीती निर्माण व्हावी त्यासाठी केला जात आहे. यासंदर्भात बहुसंख्य आमदार आमच्याबरोबर आहेत.

# विनापरवाना गावठी पिस्तुल बाळगणारा तरुण ताब्यात

**शिरपूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील खामखेडा गाव शिवारातील रस्त्यावरून एका तरूणाच्या ताब्यातील विनापरवाना पिस्तुलसह चार जीवंत काडतुस जप्त करण्यात शिरपूर तालुका पोलिसांना यश आले आहे.

शिरपूर तालुका पोलीस ठाण्याचे सपोनि.जे.एस.खलाणे यांना मध्यप्रदेशातील रहिवासी व ह.मु.पिंपरी-चिंचवड, पुणे येथील गोविंद मुलचंद सोलंकी हा २९ वर्षीय तरूण खामखेडा गावाकडून सत्रसेन मार्गे चोपडा शहराकडे गावठी पिस्तुल घेवुन जात असल्याची गुप्त माहिती मिळाली. त्या अनुषंगाने सपोनि. जे.एस.खलाणे यांनी पथकाला कारवाईच्या सुचना केल्या. त्यानुसार पथकाने सदर तरूणास सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास खामखेडा गावाकडे जाणार्या रस्त्यावरून ताब्यात घेतले. त्याची झाडाझडती घेतली असता त्याच्या ताब्यातून विनापरवाना एक गावठी बनावटीचे पिस्तूल, एक मॅगझीन व चार जीवंत काडतूस मिळून आले. या कारवाईत २५ हजार रूपये किंमतीच्या गावठी कट्ट्यासह चार हजार रूपये किंमतीची चार जीवंत काडतूस मिळून एकूण २९ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गोविंद सोलंकी याचेवर शिरपूर तालुका पोलीस ठाण्यात पोकॉ.मुकेश पावरा यांच्या फिर्यादीवरून गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. तपास पोसई.संदीप पाटील यांना सोपविण्यात आला आहे. सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन हिरे यांचे मार्गदर्शनाखाली शिरपूर तालुका पोलीस स्टेशनचे सपोनि.जे.एस.खलाणे, पीएसआय.संदीप पाटील, पोहेकॉ. सागर ठाकूर,पोना.संदीप ठाकरे, पोकॉ.संतोष पाटील, योगेश मोरे, प्रकाश भिल, मुकेश पावरा, चालक पोकॉ.मनोज पाटील यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

# धुळ्यात गुरुपौर्णिमा उत्सव जल्लोषात साजरा





**धुळे । प्रतिनिधी**

त्र्यंबकेश्वर येथील श्री स्वामी समर्थ गुरुपीठासह देशभरातील केंद्रांत गुरुपूजनाचा सोहळा मंगलमय वातावरणात साजरा करण्यात आला. देशभरातील लाखो समर्थ सेवेक-यांनी श्री स्वामी समर्थ महाराज व गुरुमाउलींचे पूजन करून त्यांचे आशीर्वाद घेतले. त्यासाठी पहाटेपासून सर्व समर्थ केंद्रांवर सेवेकरी व भाविकांनी गर्दी केली होती.

फ्धुळे शहरातील असंख्य हिंदू-मुस्लिमांचे श्रध्दास्थान असलेल्या प.पू. दंडेवालेबाबा यांच्या तपोभूमीवर गुरुपौर्णिमेनिमित्त विकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. गुरुपौर्णिमेनिमित्त सकाळी मान्यवरांच्या हस्ते आरती करण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम झाला. शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. शहरातील पंचायत समिती जवळ असलेल्या प.पु. सद्गुरु दंडेवालेबाबा यांच्या तपोभूमीवर गुरुपौर्णिमेनिमित्त दरवर्षी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. हिंदू-मुस्लिमांसह विविध धर्मियांचे श्रध्दास्थान असलेल्या या तपोभूमीवर या दिवशी भाविकांची मोठी गर्दी होत असते. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून दंडेवाले बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच मान्यवरांच्या हस्ते आरती करण्यात आली. महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिसरातील असंख्य भाविकांनी दंडेवालेबाबांचे दर्शन घेत महाप्रसादाचा लाभ घेतला. याप्रसंगी ॲड. जवाहर पाटील, गोविंददादा साखला, जितेंद्र बोरसे, जयवंत वानखेडे, सुनील खरात, राजकुमार पाटील, मधु मोरे, गजूआण्णा वाघ, श्री. लिली, मुन्ना माळी, अमोल जाधव, गटलू पाटील, तात्या कोळी, विजय चौधरी, महेंद्र कांबळे, अस्लम काकर, सुरेश पाटील, राजेंद्र पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन सद्गुरु दंडेवाले बाबा यांच्या भक्तांकडून करण्यात आले.

# सुक्ष्म नियोजनाने 'शासन आपल्या दारी'उपक्रम यशस्वी करुया : जिल्हाधिकारी

**धुळे । प्रतिनिधी**

राज्य शासनाने 'शासकीय योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'शासन आपल्या दारी'हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाच्या जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे सर्व विभागप्रमुखांनी स्क्षूम नियोजन करुन हा उपक्रम यशस्वी करावा. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी केले.

शासन आपल्या दारी अभियानातंर्गत धुळे जिल्हास्तरीय कार्यक्रम मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत येत्या १० जुलै, २०२३ रोजी धुळ्यातील एस.आर.पीएफ बल गट क्रमांक ६ येथील मैदानावर सकाळी ११.०० वाजता होणार आहे. या कार्यक्रमाची पूर्वतयारी आढावा बैठक





येथील जिल्हा नियोजन भवनात जिल्हाधिकारी श्री. शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली, यावेळी ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी बुवनेशवरी एस. मनपा आयुक्त देविदास टेकाळे, उप वनसंरक्षक नितिनकुमार सिंग, अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, सहाय्यक जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, परिविक्षाधीन सनदी अधिकारी सत्य्म गांधी, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावडे उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी जिल्हा प्रशासनातील २७ वरिष्ठ अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या जोडीला सुमारे ७० सहाय्यक नोडल अधिकारी देखील काम बघणार आहे. निवासी जिल्हाधिकारी नितीन गावडे यांनी शासन आपल्या दारी उपक्रमाबाबत नोडल अधिकारीनिहाय सोपविलेल्या जबाबदारीचे सादरीकरण करुन आढावा घेतला. आढावा बैठकीत जिल्हाधिकारी श्री. शर्मा म्हणाले की, त्या-त्या विभागाचे अधिकारी यांनी दिलेल्या जबाबदारीनुसार नियोजन करावे. मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमासाठी येणार्या प्रत्येक लाभार्थ्यासाठी पार्किंग, भोजन व पिण्याच्या पाण्याची चोख व्यवस्था ठेवावी, उपस्थित राहणार्या दिव्यांग लाभार्थ्यांची स्वतंत्र्य व्यवस्था करावी. आरोग्यसुविधा उपलब्ध ठेवावी. तसेच जास्तीत जास्त लाभार्थी उपस्थित राहण्यासाठी व्यापक प्रचार व प्रसिद्धी करावी.

कार्यक्रमाच्या ठिकाणी रोजगार मेळावा तसेच आरोग्य शिबिर व रक्तदान शिबिराचे आयोजन करावे. या कार्यक्रमास किमान १२ हजारांपेक्षा अधिक लाभार्थ्यांची उपस्थिती राहणार असल्याने कार्यक्रमस्थळी डॉक्टरांच्या टीम व रुग्णवाहिका व्यवस्था करण्यात यावी, कार्यक्रमाच्या ठिकाणी कृषी, महावितरण, महसूल, कौशल्य विकास, कामगार, जिल्हा परिषद, महानगरपालिका आदी विविध विभागांचे माहितीपूर्ण स्टॉल्स उभारण्यात येणार असून याचे नियोजन देखील व्यवस्थित करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

# अंमलपाडा येथील लाचखोर तलाठ्याला अटक

**नंदुरबार । प्रतिनिधी**

सातबारा उतार्यावर सही शिक्का देण्याच्या मोबदल्यात ३ हजाराची लाच स्विकारणार्या अमलपाडा ता.तळोदा येथील तलाठयाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ अटक केली आहे.

तक्रारदारांच्या जमिनीच्या गाव नमुना ७/१२ महसूल अभिलेख्यावर नाव नोंद करून दिले आहे. तक्रारदारांचे नाव सातबारा उतार्यावर लाऊन देण्यासाठी व नाव लावून दिलेल्या कामाबाबत व नवीन नावाच्या सातबारा उतार्यावर सही शिक्का देण्याच्या मोबदल्यात लोकसेवक असलेल्या अंमलपाडा ता.तळोदा येथील तलाठी नंदलाल प्रभाकर ठाकूर याने दि.२६ जून २०२३ रोजी तक्रारदाराकडून ५, हजार रुपये लाचेची मागणी केली. तडजोडीअंती ३ हजार रुपयांची लाचेची मागणी केली. मागणी केलेली लाचेची रक्कम ३ हजार रूपये आज दि.३ जुलै २०२३ रोजी पंच साक्षीदारांसमक्ष स्वीकारली. याबाबत तळोदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे. सापळा अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षकश्रीमती माधवी वाघ, पर्यवेक्षण अधिकारीपोलीस उपअधीक्षक राकेश आ. चौधरी, सह सापळा अधिकारीपोलिस निरीक्षक समाधान वाघ यांनी काम पाहिले.

## पुन्हा भूकंप

अजित पवार यांची सत्ताकांक्षा वादळी राजकीय घडामोडींमुळे उघड झाली. राज्य बँक गैरव्यवहार प्रकरणातील ईडीच्या आरोपपत्रात त्यांचे नाव नसणे आणि मधल्या कळातील त्यांचे 'नॉन रिचेबल' होणे सूचक होते.

पहाटेच्या शपथविधीप्रमाणे दुपारच्या शपथविधीने महाराष्ट्राच्या राजकारणात भूकंप घडविला. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. अजित पवार यांनी निवडलेला मार्ग राज्याच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करणारा ठरेल. अजित पवार यांच्यासोबत असलेल्या आमदारांची संख्या पाहता राष्ट्रवादी विधीमंडळ पक्षाच्या अस्तित्वाला हादरा बसला आहे. पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल त्यांच्याबरोबर आहेत. राष्ट्रवादीत भाकरी फिरविण्याच्या ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या निर्णयापासून अजित पवार यांची अस्वस्थता लपली नव्हती. आपल्याला विरोधी पक्ष नेतेपदाच्या जबाबदारीतून मोकळे करून पक्ष संघटनेत काम करू द्या, हे त्यांनी जाहीरपणे आणि पक्षातील वरिष्ठ नेत्यांसमोर सांगून टाकले होते. पक्षात झालेल्या कोंडीमुळे त्यांनी टोकाचा निर्णय घेतला का? याची चर्चा आणखी बराच काळ सुरू राहील. इतक्या वर्षांनंतरही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राज्यात स्वबळावर सत्तेत का येऊ शकत नाही? या त्यांच्या सवालाचा रोख शरद पवार यांच्याकडे असल्याची चर्चा रंगली. गेल्या काही दिवसांपासून पहाटेच्या शपथविधीवरून उपमुख्य मंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्यात आरोप - प्रत्यारोपाच्या फैरी झडत होत्या. तेव्हाच्या शपथविधीला पवारांचा पाठिंबा होता किंवा नाही, हा मुख्य मुद्दा बनला होता. भाजपबरोबर चर्चा झाली होती, मात्र ती बोलणी थांबली, असा खुलासा पवार यांनी केला. याचा अर्थ अजित पवार यांनी तेव्हा बंड केले, असाच घेतला गेला. अजित पवार यांना आपल्या बाजूला ओढून भाजपने एका दगडात अनेक पक्षी मारले आहेत. कोणत्याही स्थितीत केंद्रात पुन्हा मोदी यांचे सरकार आणण्यासाठी विरोधकांमधील शक्तीशाली गटाची मदत घेतल्याशिवाय राजकीय समीकरण अनुकूल होणार नाही, हे भाजपचे गणित आहे. शिवसेनेच्या शिंदे गटाची ताकद पुरेशी ठरणार नाही, याची जाणिव फडणवीस यांना आहे. शिवसेना फोडून राज्यात सरकार आले, मात्र फुटीनंतर उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणखी आक्रमक झाली. सरकार जाऊनही महाविकास आघाडीची एकजूट कायम राहिली.

अजित पवारांचा पर्याय

अशावेळी विरोधकांची ताकद कमी करण्यासाठी भाजप पर्यायाच्या शोधात होताच. तो पर्याय अजित पवार हाच असू शकतो, याची खात्री भाजपला पूर्वीच झाली. शिवसेनेचे संजय राऊत यांच्यासारखे नेते सातत्याने त्याकडे निर्देश करत होते. तरीही पवारांचे बोट धरून राजकारणात आलेले त्यांचे सख्खे पुतणे त्यांना आव्हान देणार नाहीत, असे सर्वजण धरून चालले होते. राज्याच्या राजकारणात मागील विधानसभा निवडणुकीनंतर सुरु झालेला खेळ अद्याप थांबलेला नाही हाच कालच्या घडामोडींचा अर्थ. यात सामान्यांचा विचार करण्याची राजकीय पक्षांची अजिबात तयारी नाही, हे मात्र ठळकपणे दिसले. अजित पवार सोबत आल्याने शिंदे गटावरील फडणवीस यांची भिस्त कमी होणार आहे. पक्ष सोडून जाणारे नेते ही आपल्यासाठी नवी बाब नाही, आम्ही जनतेचा कौल घेऊ, असे सांगत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी लढण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. मागील निवडणुकीच्या प्रचारात देवेंद्र फडणवीस आणि शरद पवार यांच्यातील शाब्दिक युद्ध शिगेला पोहोचले होते. ईडी कार्यालयात स्वतः जाऊ, हे त्यांनी जाहीर केले. त्यातून आणि पावसात भिजत सातार्यात झालेल्या त्यांच्या सभेने निवडणुकीचे चित्र बदलले. यावेळी तोच निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. त्या भूमिकेला कसा प्रतिसाद मिळतो हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. काका आणि पुतण्या राजकीय मैदानात आमने सामने येत आहेत. अजित पवार यांचे बंड महाविकास आघाडीचा अवसानघात ठरणारे आहे, असे वरकरणी दिसत असले तरी शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाप्रमाणे शरद पवार यांच्या नेतृत्वाला मानणारा गट राजकीय अस्तित्वासाठी अधिक आक्रमक होऊ शकतो. आता शिवसेनेबरोबरच राष्ट्रवादी काँग्रेससाठीही महाविकास आघाडी ही गरज ठरली आहे. नव्याने राष्ट्रवादीच्या कार्याध्यक्षपदी नियुक्ती झालेल्या सुप्रिया सुळे यांनाही नेतृत्व सिद्ध करण्याचे आव्हान राहणार आहे.

# गुरू-शिष्याचे नाते : 'गुरुपौर्णिमा'



गुरू ब्रह्मा गुरू विष्णु, गुरू देवो महेश्वरा
गुरू साक्षात परब्रह्म, तस्मै श्री गुरूवे नमः

मी समर्थ. गुरुपौर्णिमेच्या या मंगल दिनी माझ्या सर्व गुरुजनांना माझा प्रणाम. तिथीनुसार आषाढ महिन्यातील शुद्ध पौर्णिमेला संपूर्ण भारतात गुरुपौर्णिमा मोठ्या श्रद्धेने साजरी केली जाते. भारतातील सणांमध्ये गुरुपौर्णिमेला विशेष महत्त्व आहे. हिंदू, बौद्ध, जैन, शीख धर्मामध्ये गुरूला महत्त्वाचे स्थान आहे. या लोकांच्या मान्यतेनुसार गुरूमध्ये अंधाराचे रूपांतर प्रकाशात करण्याची शक्ती असते. कुंभार ज्याप्रमाणे सुबक रितीने मातीचे मडके घडवतो अगदी त्याच तऱ्हेने गुरू चांगल्या-वाईट गोष्टींची पारख करून अत्यंत परिश्रमाने आपल्या शिष्याला घडवीत असतात. या गुरूला वंदन करण्याची संधी शिष्याला मिळावी, त्याकरिता 'गुरुपौर्णिमा' हा दिवस निर्माण करण्यात आलेला आहे.

भारतात गुरुपौर्णिमा ही पुराणकाळापासून गुरू आणि शिष्य यांच्या नात्यातून सुरू झाली. पूर्वीच्या काळात शिष्य स्वतःचे घर सोडून गुरूच्या आश्रमात किंवा त्यांच्या घरी राहत असत. ज्ञान मिळवण्यासाठी शिष्याला सुखवस्तू जीवनाचा त्याग करावा लागत असे. ज्ञानप्राप्तीनंतर गुरूला गुरुदक्षिणा देण्यासाठी गुरुपौर्णिमा साजरी केली जात असे.

गुरुपौर्णिमेचे आध्यात्मिक महत्त्व -

महर्षी वेद व्यासांचा जन्म गुरुपौर्णिमेच्या दिवशी झाला होता. महर्षी वेद व्यासांनी महाभारतासारखे महाकाव्य रचले होते. यासोबतच सर्व अठरा पुराणांची रचनाही गुरू वेद व्यासांनी केली होती. महाभारत हे सामान्य माणसाला धर्मशास्त्र, नितीशास्त्र, व्यवहारशास्त्र आणि मानसशास्त्राची देखील ओळख करून देते. अशा महान आणि श्रेष्ठ ग्रंथाची निर्मिती करणारे महर्षी व्यास. त्यांच्या ऐवढा महान गुरू अद्याप झाला नाही. त्यांच्या श्रेष्ठत्वाची पूजा करण्याचा हा गुरुपौर्णिमेचा दिवस व्यासपौर्णिमा म्हणून देखील ओळखला जातो.

भारतीय संस्कृतीचे मुलाधार आणि शिल्पकार महर्षी व्यासांना समजले जाते. ज्ञानेश्वर महाराजांनी देखील ज्यावेळी 'ज्ञानेश्वरी' लिहिण्यास सुरुवात केली त्यावेळी सुरुवातीलाच 'व्यासांचा मागोवा घे तू' असा उल्लेख करून व्यासांच्या श्रेष्ठत्वाप्रती कृतज्ञता व्यक्त केलेली आपल्याला पाहावयास मिळते. आपल्या सर्वांच्या जीवनात गुरूचे खूप महत्त्व आहे. आपल्यातील अज्ञानाचा अंधार दूर करून आपल्यात ज्ञानाचा प्रकाश भरणारा गुरूच असतो. महर्षी व्यासांनी प्रथम संपूर्ण मानव जातीला वेदांचे ज्ञान दिले. प्रथमच मानवजातीमध्ये वेददर्शन घडवून आणल्यामुळे त्यांना प्रथम गुरूचा दर्जा देण्यात आला. सनातन धर्माच्या शास्त्रानुसार भगवान ब्रह्मा आणि शिव यांना जगाचे पहिले गुरू मानले जाते. ब्रह्मदेवाने आपल्या मानस पुत्रांना शिकवले होते, तर शिवशंकराने आपल्या ७ शिष्यांना शिक्षण दिले होते. पुढे त्यांना 'सप्तऋषी' म्हटले जाऊ लागले. गुरू आणि शिष्य परंपरेची सुरुवात महादेवानेच (शिव) केली, त्यामुळे आजही तीच परंपरा समाजात नाथ, शैव, शाक्त आदी संत मंडळींमध्ये पाळली जात असल्याचे दिसून येते. प्रचलित समजुतीनुसार भगवान शंकराची ही परंपरा आदी शंकराचार्य आणि गुरू गोरखनाथ यांनी पुढे नेली.

भगवान दत्तात्रेय हे भगवान शंकरानंतरचे सर्वात मोठे गुरू मानले जातात. पौराणिक कथांनुसार त्यांना ब्रह्मा, विष्णू, महेश या तिन्हींकडून दीक्षा आणि शिक्षण मिळाले होते. दत्तात्रेयाचे भाऊ ऋषी दुर्वासा हे महायोगी असल्याचा उल्लेख धार्मिक ग्रंथांमध्ये आढळतो. दत्तगुरू हे ब्रह्मदेवाचे पुत्र अत्रि आणि कर्दम ऋषींची कन्या अनसूया यांचे पुत्र होते. आचार्य शुक्राचार्य हे असुरांचे गुरू होते. धार्मिक दंतकथांनुसार शुक्राचार्यांना असुरांचे गुरू मानले जाते. प्रचलित समजुतीनुसार, प्राचीन काळी असे अनेक असुर झाले आहेत ज्यांचे गुरू शुक्राचार्य होते. गुरू-शिष्यांचे उत्तम उदाहरण, खरं पूजन, खरी गुरुपूजा म्हणजे गुरूंनी आपल्याला जे ज्ञान दिले आहे. जो बोध, जी शिकवण दिली आहे. त्याचे प्रत्यक्ष आचरण करणे. आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये गुरू-शिष्याच्या नात्याला एक अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपल्याकडे जसे सद्गुरू आहेत. तसेच सद् शिष्यही आहेत. ह्या दोन्ही मोठ्या परंपरा आपल्याकडे आहेत. गुरूशिष्यांच्या परंपरेत आपल्याकडे अनेक नावे आहेत. उदाहरण : राम लक्ष्मण - विश्वामित्र, परशुराम - कर्ण, महर्षी व्यास आणि गणेश, वशिष्ठ आणि राम, कृष्ण आणि सांदीपनी, अर्जुन - द्रोणाचार्य, एकलव्य - द्रोणाचार्य, चाणक्य - चंद्रगुप्त, मच्छिंद्रनाथ आणि गोरक्षनाथ, निवृत्ती ज्ञानदेव, रामकृष्ण परमहंस - स्वामी विवेकानंद, जनार्दन स्वामी व एकनाथ इ.

भगवंत श्रीकृष्णांनी सांदीपनी ऋषींच्या घरी लाकडे वाहिली. संत ज्ञानेश्वरांनी आपले थोरले बंधू निवृत्तीनाथांनाच गुरू मानले, तर संत नामदेवांचे गुरू होते विसोबा खेचर. या गुरूपरंपेला पाहिल्यानंतर आपल्या लक्षात येते की, भारतीय परंपरेने गुरूला कायमच पुजनीय मानले आहे. गुरू म्हणजे मार्गदर्शक आणि पौर्णिमा म्हणजे प्रकाश. गुरूकडून मिळालेल्या ज्ञानाने जीवन प्रकाशमय होते. गुरूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस असतो. प्रत्येकाच्या आयुष्यात कोणीतरी गुरू हा असतोच. सर्वांच्या आयुष्यातील प्रथम गुरू म्हणजे आपली आई असते. कारण सर्वांना सर्वात पहिली संगत आपल्या आईची असते. आईचं आपल्याला चालायला, बोलायला आणि जगायला शिकवते. आपल्या जीवनात मूल्यांची रुजवण करते. जगातील प्राथमिक ज्ञान आपण आपल्या आईकडून घेतो. एवढेच नाही तर आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आई आपली मार्गदर्शक असते. आईप्रमाणेच वडील देखील तेवढीच महत्त्वाची भूमिका साकारत असतात. पुढे शालेय जीवनातील अनेक शिक्षक, आपले मित्र, चांगली पुस्तके इ. आपले गुरू असू शकतात. गुरूची महती थोर असते म्हणून लहानपणापासून आपल्याला 'आचार्य देवो भव' ही शिकवण शिकविली जाते. गुरू किंवा शिक्षक हा देवताप्रमाणे असतो. याच शिकवणीमुळे, समाज मान्यतेमुळे भारतात गुरुपौर्णिमा आजही मनापासून आणि श्रद्धापूर्वक साजरी केली जाते.

क्रिकेटप्रेमी सचिनला क्रिकेटचा देव मानतात. मात्र सचिनच्या व्यक्तिमत्त्वाला खरे पैलू त्याच्या गुरूंमुळे मिळाले. रमाकांत आचरेकर सरांनी दिलेल्या प्रशिक्षणामुळे सचिन तेंडुलकर हे नाव लोकप्रिय झाले. आजही असे अनेक प्रसिद्ध लोक आहेत ज्यांच्या गुरूंमुळे ते प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचू शकले. कलेच्या क्षेत्रात तर अनेक वर्षांची साधना गुरू आपल्या शिष्यासाठी पणाला लावत असतो. गायन क्षेत्रातही अनेक गायकांच्या गुरूंवरून त्यांच्या गाण्याचे घराणे ठरत असते. व्यवसायात देखील गुरूच्या मार्गदर्शनाप्रमाणे उद्योगधंद्यात प्रगती करणारे अनेक लोक आहेत. थोडक्यात जीवनात गुरूशिवाय तरणोपाय नाही हेच यावरून सिद्ध होते. अशा या गुरूप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता आपण गुरुपौर्णिमेला गुरूचरणी नतमस्तक होत आदर व्यक्त करतो.

गुरू पूजनाचा खरा अर्थ आपल्या गुरूंनी दिलेले ज्ञान आत्मसात करणं. गुरूकडून मिळवलेल्या ज्ञानाचा आचरणात आणण्याचा प्रयत्न करणं. आपलं जीवन यशस्वी झालं, यासाठी सतत गुरूबद्दल कृतज्ञता आणि आदर करणं म्हणजे खरं गुरू पूजन आहे. अशा प्रकारच्या गुरू पूजनातूनच गुरूला खरी गुरुदक्षिणा मिळत असते. कारण जेव्हा शिष्याची प्रगती होते, तेव्हा ती प्रगती पाहून गुरूला खरा आनंद होत असतो. खऱ्या गुरूसाठी हा एक प्रकारचा सन्मान असतो. गुरू हे त्यांच्याजवळील अनुभवातून शिष्यांना मार्गदर्शन करत असतात. जीवन जगत असताना या ज्ञानाची आणि अनुभवाची प्रत्येकालाच गरज असते. स्वभावातून शिकण्यापेक्षा एखाद्या तज्ज्ञ व्यक्तीचा सल्ला घेतल्यामुळे जीवनात समस्या लवकर सोडवता येतात आणि जीवन सुखी-समाधानी होते. म्हणजेच जीवनात गुरूशिवाय तरणोपाय नाही. म्हणूनच जन्म देणारी आई असो अथवा आध्यात्मिक मार्गदर्शन करणारे सद्गुरू असो. खरा गुरू मिळणं ही भाग्याची गोष्ट आहे. ज्यांच्या जीवनात खरा गुरू किंवा सद्गुरू आहे त्यांचे जीवन यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही. मात्र शिष्याला गुरूप्रति कृतज्ञता आणि श्रद्धा असणे गरजेचे आहे. यासाठी गुरुपौर्णिमेचे महत्त्व प्रत्येकाला माहीत असणे आवश्यक आहे.

आई-वडील आणि शिक्षकांप्रमाणे माणसाला जीवनात आध्यात्मिक प्रगती करण्यासाठी आध्यात्मिक गुरूंची गरज असते. खरे गुरू तेच असतात, जे त्यांच्या शिष्याचे जीवन आणि संसार सुखाचा करण्यासाठी योग्य अचूक मार्गदर्शन करतात. आजकाल मात्र गुरू मार्गदर्शन दाखवण्याऐवजी व्यवहार करून शिष्याची फसवणूक करताना आपल्याला दिसतात. त्याचप्रमाणे स्वतःजवळील अपुऱ्या ज्ञानातून शिष्याचा बुद्धिभेद करणारे गल्लाभरू गुरु गल्लोगल्ली निर्माण झाले आहेत. अशा प्रकारच्या गुन्ह्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळे खरे गुरू अथवा सद्गुरू ओळखणे फार कठीण झाले आहे. यासाठी शिष्यांनी गुरूची ओळख पटविण्यासाठी भावापेक्षा तर्कशुद्ध व आपल्या स्वतःच्या बुद्धीचा वापर करावा.

**- राजश्री बोहरा**

**(लेखिका अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या मुंबई प्रदेश अध्यक्षा आहेत)**

## खाकी वर्दीतही छंद जोपासताना कॅमेरा बनला सहप्रवासी



चित्रकारांनी चित्र काढावे, शिल्पकारनं शिल्प, गायकाने गाण गावं, नृत्यांगणाने नृत्य हे तसं रूढ अर्थाने योग्य. पण जर एखाद्या उद्योजकाने गाणं म्हटलं, एखाद्या सिने अभिनेत्याने चित्र काढलं, डॉक्टराने सुंदर गायलं तर हे मात्र निश्चितच वेगळं, हे वेगळेपण तेव्हाच शक्य होतं जेव्हा त्या व्यक्तिमत्वामधला कलाकार हा सदैव जागृत असतो. कर्माने तो वेगवेगळ्या क्षेत्रात आपलं कर्म करत असतो पण त्याचा कलाकार हा पिंड त्याला सदैव प्रोत्साहित करत असतो. आपल्या आवडत्या छंदाची जोपासना करण्याचा, असा प्रयत्न जेव्हा तो कलाकार करतो तेव्हा सर्वांचं लक्ष त्याकडे आपसूक जातेच असाच वयाच्या आठव्या वर्षी छंदाच्या निमित्ताने हातात घेतलेला कॅमेरा पुढे आपल्याला खाकी वर्दीतही आयुष्यभर साथ संगत देईल व सहप्रवासी बनेल असे कदाचित महाराष्ट्राचे डिशनल डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस डॉक्टर रवींद्र सिंगल यांना स्वप्नातही वाटले नसेल.

आपण घेतलेलं व्यवसायिक शिक्षण आणि आपण करत असलेली सेवा, कर्तव्य यामध्ये कुठलंही अंतर पडू न देता ज्या कर्तव्यनिष्ठेने पोलीस अधिकारी म्हणून सेवा ते करत आहेत. त्याच निष्ठेने फोटोग्राफीची आपल्या आवडत्या छंदाची जोपासना ते करताना दिसतात. सातत्यपूर्ण प्रयत्नातून जे संचित आपल्या हाती लागतं त्याचं एक छोटंसं उदाहरण म्हणजे कल्चर यात्रा हे छायाचित्र प्रदर्शन होय. सरांनी पोलीस अधिकारी म्हणून ज्या ज्या ठिकाणी सेवा केली त्या त्या ठिकाणी त्यांनी तेथील संस्कृती परंपरा, चालीरीती यांचा सखोल अभ्यास केला आणि तो अभ्यास करताना जे मनाला भावलं, जे हृदयाला स्पर्श करून गेलं, त्याची आठवण आपल्याकडे सतत असावी या उद्देशाने सर नियमितपणे आपल्यासोबत कॅमेरा घेत आहेत. जेव्हा जेव्हा संधी मिळेल त्या-त्या वेळेस हे सर्व भारताची संस्कृती परंपरा आपल्या कॅमेरामध्ये बंदिस्त करत आहेत.

सेवेच्या निमित्ताने भ्रमंती ही प्रत्येक मोठ्या शासकीय अधिकाऱ्याची ठरलेलीच असते. कामाचा व्यापही खूप असतो पण त्या व्यापातूनही स्वतःच्या सुखासाठी स्वतःच्या समाधानासाठी, मनशांतीसाठी त्यांनी चित्रे रेखाटली, फोटोग्राफी हे माध्यम व्यक्त होण्यासाठी निवडलं जागतिक पटलावरील मानांकित खडतर आयर्न मॅन हा किताब जिद्दीने पटकावला. पोलीस अधिकाऱ्याची शिस्त, नीटनेटकेपणा, जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन, दृष्टी ,सय्यमीपणा, प्रत्येक गोष्ट सूक्ष्मपणे समजून घेण्याची गुणग्राहकता त्यांच्या व्यक्तिमत्वात ठळकपणे दिसते.

सण आपल्याला जीवन साजरे करण्याची, आपल्या संस्कृतीची समृद्धता अनुभवण्याची आणि सामुदायिक भावनेचा आनंद घेण्याची आठवण करून देतात असं त्यांना नेहमी वाटतं. संस्कृतीच्या, जनसामान्यांच्या रक्षणाची जबाबदारी सक्षमपणे उचलताना, परंपरेची जोपासना करत भारतीय जीवनाचं प्रतिबिंब ते आपल्या कॅमेरात सतत टिपत आहे.

हा प्रवास खूप जुना आहे. पण या प्रदर्शनात त्या प्रवासातील निवडक सुंदर अशा छायाचित्रांचा समावेश केलेला आहे.

त्यात बघायला मिळतं कष्ट करून उन्हातानात घाम गाळणारी शेतकरी, थोडं विश्रांती करणारी कष्टजीवी, त्यांच्या वेदना, आनंद, सुख, समाधान भारताच्या विविध प्रदेशात साजरे होणारे सण, उत्सव, नृत्यप्रकार, नाशिकची पारंपरिक रंगपंचमी, कुंभमेळा, साधूंचे वैराग्य जीवन, कुंभमेळ्याचे विलोभनीय प्रसंग, रीतिरिवाज, केशभूषा, राहणीमान वेशभूषा हे उत्तमरीत्या सरांनी आपल्या कॅमेरात बंदिस्त केले आहे. प्रदर्शनाच्या निमित्ताने भारताच्या संस्कृती, परंपरेचे दर्शन कलारसिकांना होणार आहे. हे प्रदर्शन दोन जुलै पर्यंत नाशिक मधील प्रसिद्ध रिच आउट आर्ट गॅलरी, कॅनडा कॉर्नर येथे सकाळी ११ ते ७ या वेळेत सर्वांसाठी खुले आहे. नाशिककरांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांमार्फत केले आहे.

**- चित्रकार अतुल भालेराव**

## शब्दकोडे-१११



**आडवे शब्द**

१. चांदी ४. ऋतूचक्रातील पहिला आणि शेवटचा ८. दह्याचे पेय १०. कुबड, वक्रता ११. क्षमाशील १३. एकमेकांसमोर १५. मुस्कटदाबी १६. अंमलदार १९. म जबूत २०. मोठा जमीनदार २३. निर्झराचा आवाज २६. पुष्कळ २७. द्रव २८. झटपट, लवकर ३०. वेळ घालविणे ३१. चकमक, लढाई ३२. बांबूची पाटी ३४. नम्रता ३६. मुदतीचा शब्द ३७. परंतु ३९. प्रजा ४२. शोध, माग ४४. जाडसर पीठ ४६. आयुष्य ४९. माफी ५०. एक कैफी पदार्थ ५३. वर्षातून कधीतरी ५६. ऐटबाज, भपकेबाज ५९. कामदेव ६१. वृक्ष ६२. लोक ६३. श्रीमंत ६५. वर्ष, संवत्सर ६६. दोनशे ६८. शूर, पराक्रमी पुरुष ७०. मृत्तिका ७१. भरभराट ७३. युद्धास उत्सुक असलेला ७५. पुरुष ७७. गाण्यातील शब्दाला शब्द ७९. मोठा नगारा ८०. थंड ८२. बासरी ८४. अवाजवी ८६. काहीच्या काही वाढवून! ८९. खोटे बोलणारा ९०. छान, झकास ९१. पुरणाची करंजी ९२. भावाची बायको

**उभे शब्द**

१. रक्षण करणारा २. शिल्लक ३. पाण्यावरील तेलाचा थर ५. रागीट ६. शिरच्छेद, कत्तल ७. रसाळ ८. चांदणी ९. तारांबळ १०. मूल १२. शिव्याशाप १४. पिसारा फुलवणारा १७. हरळीसारखा कापडाचा मऊ प्रकार १८. रांग १९. कान २०. डाळीचे कालवण २१. करार २२. जीभ, जिव्हा २३. प्रयत्न, खटपट २४. जखमेवरील पापुद्रा २५. डोक्यावर हळूच मारलेली चापटी २६. तातातूट २९. हजार किलो ३१. मलई ३३. गोव्याची राजधानी ३५. धातूचा जाड धागा ३६. दिवस ३८. जंगली, वन्य ४०. कुबेराचा सेवक ४१. लोकनाट्य ४३. खुंटी, मेख ४५. बातमीदार ४७. वस्त्र, कापड ४८ तिबेटी धर्मगुरू ५१. संपूर्ण ५२. अगदी सारखे ५४. थोडक्यात सार ५५. गारवा देणारे ५७. टक, पाहणे, दृष्ट ५८. दानी, दानशूर ६०. एक श्वासरोग ६४. बरणीच्या तोंडाला बांधलेले कापड ६६. दुसरा ६७. पूजेचे ताट ६८. नम्रतेने झुकलेला ६९. युद्ध गाजविणारा ७२. कट्टर ७४. पायऱ्यांची विहीर ७६. धपाटा ७८. वाळू, वाळवंट ८१. शिवरायांची कुलस्वामिनी ८३. घाव, प्रहार ८४. शेवट, नाश ८५. पारंब्यांचा वृक्ष ८७. एकमेकांचे कान धरून खेळण्याचा खेळ- -- म्याव ८८. स्वाक्षरी

### शब्दकोडे ११० चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.परावलंबन ६.मखर ९.सच
१०.दरारा ११.दासबोध
१३.डबाबाटलीवाला १६.तलम
१८.संतत १९.शेखी २०.मग
२१.नादार २३.गोळीबार
२५.नातलग २८.साय
२९.बारीक ३१.अंतर
३३.अदाकार ३५.कवाड
३७.सावज ३८.गजानन ४०.नद
४२.तवा ४३.आर ४४.तपास
४६.सालोसाल ४९.कणीदार
५१.ताडमाड ५२.भाक
५३.दामाजी ५५.नगर ५७.मकरंद
५९.बारव ६०.जग ६१.सुधाकर
६२.हरा ६४.थांबा ६५.रानटी
६७.मनगट ६९.कथन ७०.कानन
७१.राजस ७३.रफार ७५.जळका
७७.मालक ७९.फसणे
८१.रचनाकर ८२.तड ८३.काशी

**उभे उत्तर**

१.पदभ्रमण २.रास ३.वरात
४.बदाम ५.नस ६.मध
७.रडतराऊत ८.अंबा ९.सवाशेर
१२.बोगदा १४.बात १५.टकळी
१७.लगत २१.नागरी २२.रस
२३.गोडी २४.बारदान २५.नायक
२६.लबाड २७.दरबार
३०.कसाबसा ३१.अंजन
३२.रग ३३.अनवाणी ३४.मदत
३६.वाणी ३९.जातककथा
४१.दया ४३.आरमार ४५.सतार
४६.सामानसुमान ४७.लोड
४८.लवकर ५०.दादा बाबा करणे
५४.जीवदान ५५.नजरानजर
५६.गगन ५७.मकबरा ५८.दहन
६३.राग ६६.टीकाकार
६७.मसलत ६८.टरफल ७२.जमा
७४.फास ७६.धोका ७८.कड
८०.शिशी

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# गुरूला प्रसन्न करण्यासाठी मन शुध्द असावे : साध्वी हिराजी यांचे प्रतिपादन

**नाशिक । प्रतिनिधी**

शिष्याचे गुरूशी भक्तीचे नाते असते. अध्यात्मिक गुरूंना भौतिक सुखाने प्रसन्न करता येत नाही. गुरूंना प्रसन्न करण्यासाठी भक्ताचे मन शुध्द असायला हवे, असे प्रतिपादन साध्वी हिराजी यांनी सोमवारी केले.

सदगुरुदेव श्री सतपालजी महाराज प्रणीत मानव उत्थान सेवा समितीच्या वतीने गुरूपोर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. नाशिक - पुणे रोडवरील शिवाजीनगर येथील श्री हंस कल्याण धाम आश्रमात गुरू पोर्णिमा हर्षोल्हासात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात साध्वी हिराजी बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर साध्वी अवंतिकाजी, साध्वी मिथिलेशजी, साध्वी पंकजाजी, महात्मा आसक्तानंदजी उपस्थित होते. जिल्हाभरातून शेकडो मानवधर्म प्रेमी या कार्यक्रमाला उपस्थित होते.






यावेळी साध्वी हिराजी म्हणाल्या, 'गुरू पोर्णिमेचा उत्सव आज देशभर भक्तीभावाने साजरा होतो आहे. मानवाला आत्मज्ञानाची अनूभूती करून देणारे अध्यात्मिक गुरू असले तरी अनेकांना अध्यात्मिक गुरूंच्या सानिध्यात जाण्याची संधीच मिळत नाही. असे लोक भौतिक सुखामध्येच आनंद शोधण्याचा प्रयत्न करतात. परंतु अध्यात्माच्या मार्गावर चालणाऱ्या गुरूंना केवळ भक्ती प्रिय असते. धन, संपत्तीने नाही तर सेवा आणि भक्तीनेच गुरूंना प्रसन्न करता येते.

साध्वी अवंतिकाजी म्हणाल्या, 'आई - वडिल हे प्रत्येकाचे पहिले गुरू असतात. आई - वडील त्यांच्या दहा मुलांना सांभाळू शकतात परंतु दहा मुले आपल्या आई वडिलांना सांभाळू शकत नाहीत अशी परिस्थिती सध्या समाजात पहायला मिळते. यासाठीच मुलांवर बालमनापासून उत्तम संस्कार होणे गरजेचे आहे. मुलांना अध्यात्माच्या मार्ग दाखविला तर ते संस्कारशीलच बनतात. साध्वी मिथिलेशजी आणि पंकजाजी यांच्या सत्संगाचाही भाविकांना लाभ मिळाला. त्याआधी झालेल्या सुश्राव्य भक्तीगीतांमध्ये भाविक तल्लीन झाले.

---

प्रोसेड पेड **ॲड.श्री.वाय. पी.कासार, साक्री**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, यांचे कोर्टात**

**दि.कि.अर्ज क्रं. १९०/ २०२३**

श्री.बिरदीचंद कन्हैयालाल जैन व इतर-२
उ.व.-७८, धंदा-व्यापार,
राहणार- इंदवे, ता.साक्री, जि.धुळे ........**अर्जदार**
**विरुध्द**
श्री. नितीन बिरदीचंद जैन, उ.व.-४५, धंदा-वैद्यकिय व्यवसाय,
राहणार-खेतिया, ....**सामनेवाला**
मयत - कै. ताराबाई बिरदीचंद जैन -
(मृत्यू दिनांक - २०/०८/२०२०)
मयत - कै.प्रविण बिरदीचंद जैन
(मृत्यू दिनांक - ३० /१०/२०२१) ........**मयत**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, येथे दिनांक ०१/०७/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. ताराबाई बिरदीचंद जैन हिचे दिनांक २०/०८/२०२० रोजी व कै. प्रविण बिरदीचंद जैन याचे दिनांक ३०/१०/२०२१ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. श्री. बिरदीचंद कन्हैयालाल जैन,
२. श्री. गौतम बिरदीचंद जैन,
३. सौ. संगिता पारसमल चोपडा,
४. श्री. नितीन बिरदीचंद जैन,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवार दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक १६/०८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस दि.०१/०७/२०२३ रोजी कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ - साक्री
दि. ०१/०७/२०२३ आदेशावरुन

(शिक्का)
**क. लिपीक** **सहाय्यक अधिक्षक**
**कामगिरी कारकुन, साक्री** **सह.दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

---

**ॲड.संतोष एस. केदार, धुळे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथिल मा. २ रे सह दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांचे न्यायालयात**

**दि.कि.अर्ज क्रं. ७७८/ २०२३**

१. विद्याबाई भैय्यासाहेब भामरे उ.व.-४९, धंदा- घरकाम
२. संघमित्रा भैय्यासाहेब भामरे उ.व.-३१, धंदा-घरकाम
३. रत्नमाला भैय्यासाहेब भामरे उ.व.-२७, धंदा-घरकाम
४. राजश्री भैय्यासाहेब भामरे उ.व.-२४, धंदा-घरकाम
५. असावरी भैय्यासाहेब भामरे उ.व.-२३, धंदा-घरकाम
६. छबुबाई मोतराम भामरे उ.व.-७८, धंदा -घरकाम
सर्व रा. प्लॉट नं. ४६, पुरूषोत्तम नगर, एनएच - ३, भागवत गॅरेजच्या मागे, देवपुर, धुळे, ता. जि. धुळे. ........**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** ....**सामनेवाला**
**आणि**
भैय्यासाहेब मोतीराम भामरे (मयत) मृत्यु दि. ११/०९/२०१८
मृत्यु ठिकाण : प्लॉट नं. ४६, पुरूषोत्तम नगर, एनएच-३, भागवत गॅरेजच्या मागे, देवपुर, धुळे, ता. जि. धुळे ........**मयत**

ज्याआर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात भैय्यासाहेब मोतीराम भामरे (मयत) यांचे अर्जदार यांना शासकीय तसेच निमशासकीय तसेच इतर खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने तसेच अर्जदार हे भैय्यासाहेब मोतीराम भामरे (मयत) यांचे कायदेशीर वारस असून तसा वारस दाखला मिळणेसाठी दि.२७/०६/२०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. ०८/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. वरिष्ट स्तर कोर्ट नं. २, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ३०/०६/२०२३ आदेशावरुन

(शिक्का)
**कामगिरी कारकुन** **अधिक्षक**
**मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.** **मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**

---

प्रोसेड पेड **ॲड.श्री.प्रकाश डी. देवरे, साक्री**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, यांचे कोर्टात**

**दि.कि.अर्ज क्रं. १८४/ २०२३**

श्री. भास्कर पोपट देसले वै. ४, उ.व.-६६, धंदा - शेती,
राहणार दारखेल, ता. साक्री, जि.धुळे ........**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** ....**सामनेवाला**
मयत कै. पोपट नामदेव देसले
(मृत्यू दिनांक- २६/०३/२०२२) ........**मयत**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग सो., यांचे कोर्टात मुंबई वारस कायदा १८२७ चे खंड ८ अन्वये कै. पोपट नामदेव देसले यांचा वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. याकामी इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदरची जाहिर नोटीस काढण्यात आली असुन मयताचे कायदेशिर वारस पुढील प्रमाणे आहेत.

१. श्री. भास्कर पोपट देसले,
२. सौ.लिलाबाई शंकर गांगुर्डे,
३. सौ. कविता रविंद्र पाटील,
४. श्री. रघुनाथ पोपट देसले,
५. श्री. कैलास पोपट देसले,

त्याअर्थी जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मयत कै. पोपट नामदेव देसले यांचे कायदेशिर वारस घोषीत होवुन मिळणेसाठी, सरकारी व निमसरकारी कार्यालये, सिटी सर्वे, ग्रामपंचायत, महसुल कार्यालय, बॅंकिंग तसेच सहकारी कार्यालयातील कामांसाठी वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) आवश्यक आहे. वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी पुढील चौकशी तारीख ११/०८/२०२३ रोजी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर तथा न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग साो., यांचे कोर्ट नं. २ या न्यायालयात सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकिलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही, असे समजून याकामी योग्य तो आदेश पारित करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ - साक्री
दि. ०१/०७/२०२३

आदेशावरुन
(शिक्का)
**क. लिपीक** **सहाय्यक अधिक्षक**
**कामगिरी कारकुन, साक्री** **सह.दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

---

प्रोसेड पेड **ॲड. अरुणा.डी. महाजन, धुळे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश साो. व.स्तर यांचे कोर्टात**

**दि.कि.अर्ज क्रं. ७८४/ २०२३**

१) श्री. मधुकर नथु सुर्यवंशी (माळी) उ. व. ६९, धंदा-सेवानिवृत्त
रा. प्लॉट नं. ३१-अ, अजय नगर, श्रीकृष्ण कॉलनी, देवपूर, धुळे
२) श्री. दत्तात्रय नथु सुर्यवंशी (माळी) उ.व. ६५, धंदा-सेवानिवृत्त
रा. रुम नं. २, प्राचि अपार्टमेंट, सहकार नगर, पो. खोपोली, ता. खालापूर जि. रायगड - ४१०२०३
३) सौ. मंगला भ्र. सुभाष जाधव(माळी) उ. व. ६०, धंदा-घरकाम
रा. मु.पो. मोघण, ता. जि. धुळे
४) सौ. कमल भ्र. योगराज महाजन(माळी) उ.व.५५,धंदा-घरकाम
रा. स.नं. ७७, दांगट वस्ती, शिवणे, एन.डी.ए रोड, आदित्य हॉटेल जवळ, दांगट, पुणे-४११०२३ ........**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही**
कै. नथु महादु माळी (सुर्यवंशी) (मयत) मृत्यु दि. १९/१०/२०१५
मृत्यु ठिकाण - धुळे, ता. जि. धुळे ........**जाबदेणार**

**बॉम्बे रेग्युलेशन कायदा ८ (III) प्रमाणे अर्ज.**

या जाहिर नोटीसीव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मयताचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार यांनी सदरचा अर्ज केला आहे. मयत कै. नथु महादु माळी (सुर्यवंशी) हे मौजे धुळे, ता. जि. धुळे येथे दि. १९/१०/२०१५ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार यांनी कायदेशीर वारस म्हणून धुळे मे.८वे दिवाणी न्यायाधीश साो. क. स्तर यांचे कोर्टात वारस दाखला मिळणेसाठी मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ भाग VIII प्रमाणे अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाचे कामी दि. ११/०८/२०२३ रोजी पुढील कार्यवाहीसाठी तारीख नेमण्यात आलेली आहे. सदर वारस दाखला बाबत कोणाचीही हरकत / म्हणणे असल्यास अगर अधिकार असल्यास त्यांनी चौकशीच्या दिवशी सकाळी १०.३० वाजता स्वतः अथवा वकिलामार्फत धुळे मे. दिवाणी न्यायाधीश सो . क. स्तर यांचे कोर्टात हजर होवून लेखी हरकत घ्यावी.

सदर दिवशी चौकशीचे कामी कोणाचीही काहीही हरकत न आल्यास चौकशीचे कामकाज पुर्ण होवून अर्जाचा निकाल दिला जाईल. कळावे,

आज दि.०१/०७/२०२३ रोजी आमच्या सही निशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिला आहे.

धुळे
दि. ०१/०७/२०२३

आदेशावरुन
(शिक्का)
**कामगिरी कारकुन** **अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधीश साो. क.स्तर, धुळे** **दिवाणी न्यायाधीश साो. क.स्तर, धुळे**

---

प्रोसेड पेड **ॲड. श्री. अक्षय ए. सगर, साक्री**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, यांचे कोर्टात**

**दि.कि.अर्ज क्रं. १२८/ २०२३**

सौ. जयवंताबाई त्र्यंबक पगारे, व इतर - ३
उ. व. - ७३, धंदा - घरकाम,
राहणार-अंबापुर रोड, कन्हैयालाल सोसा.,
साक्री, ता. साक्री, जि. धुळे ........**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** ....**सामनेवाला**
मयत - कै.लक्ष्मण त्रंबक पगारे
(मृत्यू दिनांक - ०९/०४/२०२३) ........**मयत**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, येथे दिनांक २५/०४/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. लक्ष्मण त्रंबक पगारे यांचे दिनांक ०९/०४/२०२३ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. सौ. जयवंताबाई त्रंबक पगारे,
२. श्रीमती आशाबाई लक्ष्मण पगारे,
३. सौ. शुभांगी भ्र. योगेश पवार,
४. चि. संघर्ष लक्ष्मण पवार,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवार दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक २८/०८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस दि. ०१/०७/२०२३ रोजी कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ - साक्री
दि. ०१/०७/२०२३

आदेशावरुन
(शिक्का)
**क. लिपीक** **सहाय्यक अधिक्षक**
**कामगिरी कारकुन, साक्री** **सह.दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

---

**ॲड.गोविंद बी. साखरे, धुळे.**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील दिवाणी न्यायाधिश साो. व. स्तर यांचे कोर्टात**

**कि.दि.अर्ज नं. ७११/२०२३**

१) माधवराव धर्मा पाटील उ.व. ६४ वर्षे, कामधंदा- मजुरी
रा.प्लॉट नं. १९७, गट नं. १९९, तुळजाभवानी चौक, तुळजाभवानी मंदीर जवळ, श्रमीक नगर, सातपुर, नाशिक
२) संजय धर्मा पाटील उ.व.६२ वर्षे, धंदा- शेती
३) रविंद्र धर्मा पाटील उ.व. ५५ वर्षे, धंदा- शेती
४) नगराज धर्मा पाटील उ.व. ५३ वर्षे, कामधंदा- शेती
५) गुलाबराव धर्मा पाटील उ.व. ४८ वर्षे, धंदा- शेती
२ ते ५ रा. मुकटी, ता. जि. धुळे
६) सौ. कल्पना कैलास जाधव उ.व. ४७ वर्षे, कामधंदा-घरकाम
रा. कुसुंबे, ता. जि. धुळे ........**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** ........**जाबदेणार**
१) कै. धर्मा भिला पाटील ........**मयत**
मृत्युसमयी वय ८३ वर्षे,
मृत्यु दिनांक २२-०९-२०२१
२) कै. वेणूबाई धर्मा पाटील ........**मयत**
मृत्यु समयी वय ७५ वर्षे,
मृत्यु दिनांक १३-०१-२०२०

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात दिनांक २१/०६/२०२३ रोजी दिवाणी किरकोळ अर्ज नं.

७ ११ / २०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे.

ज्याअर्थी सदर कै. धर्मा भिला पाटील व कै. वेणूबाई धर्मा पाटील यांच्या नावे शासकीय व खाजगी कामासाठी तसा कायदेशीर वारस दाखला मिळणेसाठी मे. कोर्टात धुळे येथील अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता पुढील चौकशी दिनांक ११/०८/२०२३ निश्चित केली आहे. त्याअर्थी तमात जनतेस हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील दिवाणी न्यायाधिश साो. कस्तर यांचे कोर्टात यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी. ज्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या निश्चित तारखे पर्यंत कोणाचीही काही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

आदेशावरुन
(शिक्का)
**कामगिरी कारकुन** **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर धुळे** **दिवाणी न्यायालय व. स्तर धुळे**

---

**ॲड.टी. एस. अमृतसागर**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश साो. व. स्तर यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज नं. ७६१/२०२३**

१. लोटन किसन वाडेकर उ.व.-६७ वर्ष, धंदा-हातमजुरी,
रा. भोई गल्ली, खेडे, ता. जि. धुळे.
२. मधुकर किसन वाडेकर उ.व.-६१ वर्ष, धंदा -हातमजुरी,
रा. खेडे, ता. जि. धुळे. . ........**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** ....**सामनेवाला**
**आणि**
बारकु किसन वाडेकर (मयत) मयत दि. ०९/०९/२०२२,
मृत्यु ठिकाण : खेडे, ता. जि. धुळे. ........**मयत**

ज्याआर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात बारकु किसन वाडेकर (मयत) यांचे अर्जदार नं. १ व २ हे कायदेशीर वारस असून वारस दाखला हा शासकीय - निमशासकीय कामासाठी तसेच रेशनकार्डवर व इतर खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने तसा वारस दाखला मिळणेसाठी दि. २६/०६/२०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. १६/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. वरिष्ठ स्तर् कोर्ट नं.५, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थ मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण : धुळे
दिनांक : ०१/०७/२०२३ आदेशावरुन

(शिक्का)
**कामगिरी कारकुन** **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय सो. व.स्तर, धुळे** **मे.दिवाणी न्यायालय सो. व.स्तर, धुळे**

---

प्रोसेड पेड **ॲड. गोविंद बी. साखरे, धुळे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) साो. यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज नं. ७८०/ २०२३**

१) वनाजी तुळशिराम जाधव उ.व. ७८ वर्षे, धंदा - काहीनाही
२) संतोष वनाजी जाधव उ.व. ४१ वर्षे, धंदा- खाजगी नोकरी
दोन्ही रा. - एन-४१ / व्ही. बी. -१/१२/९,सावता नगर, सिडको कॉलनी, नाशिक
३) वंदना सावता माळी उ.व. ३९ वर्षे, धंदा - घरकाम
रा. मु. पो. मुंदाणे, प्र. अमळनेर, ता. पारोळा, जि. जळगाव
४) उज्वला शरद पाटील उ.व. ३७ वर्षे, धंदा- घरकाम
रा. शिवाजी नगर, मालेगाव रोड, चाळीसगाव,
ता. चाळीसगाव, जि. जळगाव ........**अर्जदार**
**विरुध्द**
**कुणीही नाही** ..... **सामनेवाला**
कै. सुशिला वनाजी जाधव
(मृत्यु दि. १०/०४/२०२१) ........**(मयत)**

**बॉम्बे रेग्युलेशन कायदा VIII १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकरीता अर्ज**

ज्याअर्थी वरील अर्जदार नं. १ ते ८ यांनी, कै. सुशिला वनाजी जाधव यांचे कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकामी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम ८ अन्वये वारस दाखला मिळणेकामी सदरचा दि. कि. अर्ज धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (व. स्तर) कोर्ट नं. यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. मयत कै. सुशिला वनाजी जाधव यांचे नावे असलेल्या मिळकती खालील प्रमाणे -

मौजे दोंदवाड, ता. जि. धुळे येथील शेत मिळकत गट नं. ५७/१, त्यासी क्षेत्र - १हे. - ९४आर, पैकी अविभक्त १ / ६ हीस्सा, म्हणजे क्षेत्र - ०हे. - ३२.३३ आर, व

मौजे दोंदवाड, ता. जि. धुळे येथील शेत मिळकत गट नं. ५७/२, त्यासी क्षेत्र - १हे. - ९७आर, पैकी अविभक्त १ / ६ हीस्सा, म्हणजे क्षेत्र- ०हे. - ३२.८३ आर

या मिळकती मयत कै. सुशिला वनाजी जाधव यांच्या हीस्याच्या मालकीच्या मिळकती आहेत.

त्याअर्थी मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता चौ. ता. दि. ११/०८/२०२३ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतकास, वारसांना व इतर संबंधीतांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, कोणास सदर अर्जाबाबत काही वाद, हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (क. स्तर) कोर्ट नं. ४ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहुन सदरकामी आपले म्हणणे, तक्रार, लेखी हरकत सादर करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणचीही तक्रार, लेखी हरकत न आल्यास सदरकामी कोणाची काहीएक हरकत नाही, असे गृहित धरण्यात येवून सदर अर्जाचे कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत कै. सुशिला वनाजी जाधव यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस दाखला Legal Heirship Certificate देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही, काहीएक हरकत ऐकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. अदिशावइन सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ : धुळे
दि. ०१/०७/२०२३ आदेशावरुन

(शिक्का)
**कामगिरी कारकुन** **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, धुळे** **दिवाणी न्यायालय, धुळे**

## न्यूज कॉलम

### टाळ मृदुंगाच्या गजराने वरवाडे परिसर पंढरपूरमय

**शिरपूर ।** वरवाडे येथील आर.सी.पटेल प्राथमिक शाळा आयोजित देवशयनी आषाढी एकादशी निमित्त दिंडी साकारली. वरवाडे परिसरात पालखी मार्ग टाळ मृदुंग व विठू नामांनी निनादला. यावेळी दिंडीचे आकर्षण वेशभूषेतील विठ्ठल- रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम व अन्य संतांच्या वेशभूषा केलेले विद्यार्थी ठरले. विठूरूखमाईची व संतांची वेशभूषा बालवाडीच्या विद्यार्थ्यांनी साकारली. वारकरी वेशभूषेतील मुलांनी वरवाडे परिसरातील फुलेचौक फुगडीच्या तालाने फुलवला. विठुमाऊलीच्या गजरात बाल वारकरींचे नागरिकांनी ठिकठिकाणी औक्षणही केले.

### विवाहितेचा छळ; सहा जणांवर गुन्हा

**धुळे ।** माहेरून १५ लाख आणत नाही म्हणून मारहाण करून घराबाहेर काढल्याप्रकरणी स्नेहल प्रतीक ठाकूर (वय २३, रा. वलवाडी शिवार, देवमोगरा कॉलनी, देवपूर, धुळे) या विवाहितेने पतीसह सासरच्या सहा जणांविरुद्ध पश्चिम देवपूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. २१ जानेवारी २०२२ पासून पैशांसाठी तगादा लावला होता. पैशांची मागणी पूर्ण करू न शकल्याने त्यांनी मारहाण करून स्नेहल यांना घराबाहेर काढले. त्यावरून प्रतीक नंदलाल साळुंखे, नंदलाल शिवलाल ठाकूर, सुनीता नंदलाल ठाकूर, कुणाल नंदलाल ठाकूर, गीतांजली राकेश वानखेडे (रा. वडेल रोड, धुळे) यांच्यावर गुन्हा दाखल झाला.

# जिल्ह्यातील औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची वज्रमूठ

## सर्व औद्योगिक प्रश्न सामूहिकरीत्या एकमुखी सोडवण्याचा निर्णय

### शासन दरबारी एकत्रितरित्या प्रयत्न करणार- धनंजय बेळे

**नाशिक । प्रतिनिधी**



जिल्ह्याच्या उद्योग विश्वाला भेडसावणाऱ्या विविध समस्या तसेच सामायिक मुद्द्यांवर एकत्रित लढण्यासाठी सर्व औद्योगिक संघटना एकवटल्या असून यापुढे नोकरशहांचा व वेळप्रसंगी शासनातर्फे एकतर्फी लादल्या जाणाऱ्या निर्णय व करांसाठीचा मनमानी कारभार खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा या संघटनांच्या प्रमुख प्रतिनिधींच्या निमा हाऊस (सातपूर) येथे आयोजित बैठकीत देण्यात आला.

निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे यांच्या पुढाकाराने निमा हाऊसमध्ये आयोजित बैठकीच्या व्यासपीठावर आयमा अध्यक्ष निखिल पांचाळ, नाईसचे अध्यक्ष रमेश वैश्य, महाराष्ट्र चेंबरचे नाशिकचे सह अध्यक्ष संजय सोनवणे, निमाचे उपाध्यक्ष आशिष नहार, सचिव राजेंद्र अहिरे हे होते.

औद्योगिक संघटनांपुढे पूर्वलक्षी प्रभावाने गोळा केल्या जाणारा जीएसटी, एलबीटीच्या नोटिसेस, तसेच महावितरणचे वाढीव डिपॉझिट, कामगार संघटनांचे असलेले प्रश्न तसेच कायदा व सुव्यवस्था, पोलीस प्रशासनाचे सहकार्य, एमआयडीसीद्वारे लावण्यात येणारे विविध कर, अवाजवी घरपट्टी, पायाभूत सुविधा स्वच्छता, अतिक्रमण एमआयडीसी, महावितरण तसेच विविध यंत्रणातर्फे राबविले जाणारे एकतर्फी निर्णय आदी मुद्द्यांबाबत साधक-बाधक चर्चा होऊन विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यावर आपली मते मांडली. या सर्व समस्यांचा कणखर आणि संघटितपणे मुकाबला करण्याची गरज व्यक्त करून त्यासाठी किमान सहमती कार्यक्रम आखावा. निमा ही नाशिक मधील औद्योगिक संघटनांची शिखर संस्था असल्याने तिच्या नेतृत्वाखाली काम करण्यास आम्हाला आनंदच आहे असे मत अनेक औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळेस व्यक्त केले. तसेच औद्योगिक संघटना आणि उद्योजकांचे स्थानिक स्वराज्य संस्था राज्य शासन व केंद्र शासन या स्तरांवर जे विविध प्रश्न आहेत त्याचे वर्गीकरण करण्याची आवश्यकताही यावेळेस बोलून दाखवण्यात आली.

जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटना आप-आपल्या स्तरावर प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील असतात. परंतु प्रत्येक संघटनेची मांडण्याची पद्धत वेगवेगळी असल्याने शासन किंवा अधिकारी याचा गैरफायदा घेतात व ते प्रश्न प्रलंबित ठेवतात. जिल्ह्यामध्ये मोठी गुंतवणूक आणण्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे निर्णय घेणे व शासन दरबारी पाठपुरावा करणे यासाठी औद्योगिक संघटनांचा जिल्ह्याच्या विकासासाठी दबाव गट निर्माण करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय या बैठकीत घेण्यात आला. जिल्ह्यात एमआयडीसी कडून बंद उद्योगांच्या केल्या जाणाऱ्या मोठ्या प्लॉटचे विभाजन होऊ नये. यासाठी तसेच दलालांचा सुळसुळाट थांबावा यासाठी सामूहिकपणे आवाज उठविण्याचेही या बैठकीत ठरले.

बैठकीस निमा, आयमा, निवेक, नाईस, स्टाइस, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, सीमा, लघुउद्योग भारती आदींसहित जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने संदीप पगारे, सुनील मोरे, मनीष रावल, संजय सोनवणे, राजेंद्र वडनेरे, विरल ठक्कर, गोविंद झा, राजेंद्र कोठावदे, मारुती कुलकर्णी, बबन वाजे, रतन पडवळ, मुकेश देशमुख, सुधाकर जाधव, विजय अनिकिवी, सुनील जोंधळे, कासलीवाल, बनकर, अरुण काळे, अरुण भोसले आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नाशिक जिल्हा उद्योग व निर्यातदार संघटना, समर्थ इंडस्ट्रियल इस्टेट (पिंपळगाव बसवंत), येवला, मालेगाव, कळवण,मनमाड आणि चांदवड येथील को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल इस्टेट, सिद्धी विनायक इंडस्ट्रीज लिमिटेड (ओझर), मालेगाव इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन याबरोबरच गोंदे, वाडीवरे, पाडळी, इगतपुरी, सटाणा, निफाड आदी ज्या ठिकाणी संघटना नाहीत अशा ठिकाणच्या उद्योजकांनी सुद्धा सामूहिकरित्या निमाच्या बॅनरखाली काम करण्याच्या निर्णयास व सामूहिक लढ्याच्या निर्णयास पाठिंबा दिल्याचे निमाचे अध्यक्ष व बैठकीचे निमंत्रक धनंजय बेळे यांनी नमूद केले. आभार सचिव राजेंद्र अहिरे यांनी मानले.

ही बैठक प्रत्येक महिन्याला जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यांमध्ये वेगवेगळ्या संघटनांच्या कार्यालयात व पुढाकाराने घेण्याचे ही यावेळेस निश्चित करण्यात आले.

# नव तरुणांनी कौशल्य विकासावर भर देणे गरजेचे :प्राचार्य प्रशांत पाटील

**नाशिक । प्रतिनिधी**



नाशिक मराठा सेवा संघ प्रणित मराठा उद्योजक विकास आणि मार्गदर्शन संस्था नाशिक जिल्हा यांच्या वतीने मराठा उद्योजकांची राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक कॉलेज येथे सभा उत्साहात पार पडली. यावेळी सभेसाठी संस्थेचे प्राचार्य प्रशांत पाटील, नाशिक जिल्हाध्यक्ष इंजी. विशाल देसले, जिल्हा उद्योजक कक्षाचे संपर्कप्रमुख दीपक भदाणे, जिल्हा उपाध्यक्ष माधव मुधाळे, जिल्हा सरचिटणीस उल्हास बोरसे,शहर उपाध्यक्ष बाळासाहेब आंबरे तसेच इतर जिल्हा व नाशिक शहर पदाधिकारी उपस्थित होते. प्रारंभी राजमाता जिजाऊ व राजश्री शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या सभेसाठी नाशिक शहरातील अनेक उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आयोजक प्राचार्य प्रशांत पाटील यांनी उद्योजकांचे स्वागत करून उद्योजकांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, 'जगातल्या ज्या देशांनी प्रगती केली त्या देशातील प्रगतीची चळवळ शाळा, कॉलेज, महाविद्यालय, विद्यापीठातूनच झाली. उद्योग व्यवसायात कौशल्यपूर्ण तरुण निर्माण करणे गरजेचे आहे. मोठ्या प्रमाणावर संस्थेतर्फे युवक युवतींना नवीन व्यवसाय व उद्योगासाठी सक्षम केले जाईल असे सांगितले. यावेळी उद्योजकांनी परिचय करून दिला. उद्योजक कक्षाकडून कसे बिझनेस रेफरेन्सस हवे आहेत यासंदर्भात अपेक्षा व्यक्त केली. राज्यस्तरीय मराठा उद्योजकांचे महाअधिवेशनानंतर त्यांच्या व्यवसायात कशाप्रकारे वाढ झाली व त्यांचा व्यवसाय वृद्धिंगत होण्यासाठी कशी मदत मिळाली? याविषयी अनुभव व्यक्त केले. तसेच जिल्हा सरचिटणीस उल्हास बोरसे यांनी शासकीय विविध योजनांद्वारे विनातारण उद्योग धंद्यासाठी कर्जपुरवठा कसा होऊ शकतो? उद्योग व्यवसायासाठी स्टार्टअप कसे करता येईल, बिगर भांडवल व्यवसाय कसा उभारता येईल याची सविस्तर माहिती दिली. मेकॅनिकल विभागाचे प्रमुख भूषण देशमुख, माहिती तंत्रज्ञान डिपार्टमेंटचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा.अजित पाटील यांनीही मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन दीपक भदाणे यांनी तर जिल्हा उपाध्यक्ष माधव मुधाळे यांनी आभार मानले. यावेळी अमित पवार, आदित्य कडलग, जिजाऊ ब्रिगेडच्या सुमन हिरे, शहराध्यक्ष अश्विनी पवार, लता पवार, संगीता पाटील, मनीषा नेरे, उद्योजक अमित पवार, डॉ.संदीप बोरसे, विनायक चव्हाण, डॉ.संजय पाटील, निलेश पाटील, सुशांत जाधव, प्रवीण देशमुख, विनय पाटील, विकास देशमुख, प्रतीक जाधव, सुनील घुले, कौशल पिळोदेकर, प्रा.राजेश गुरुळे, प्रा.संजय बंडावणे, प्रा.सुधीर सोनवणे, प्रा.श्रीधर गाडे, प्रा.अजित पाटील, प्रा.सुशांत आहेर, प्रा.नकुल गाडे, प्रा.योगेश कोडीलकर प्रा.योगेश हळदे यांच्यासह मोठ्या संख्येने उद्योजक व्यावसायिक उपस्थित होते.

### महिलेचा मृतदेह आढळला

**धुळे ।** शहरातील सुदर्शन कॉलनी भागात राहणारी रेखाबाई गोपाल शिंदे (३४) ही महिला तिच्या घराच्या मागील बाजूस जळालेल्या अवस्थेत आढळून आली. डॉक्टरांनी तिला मयत घोषीत केले.

CHANGE NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM:
YOGESH HIRALAL KOLI
TO
YOGESH HIRALAL ISHI
**ADDRESS** : 494 KOLI WADA AT POST WAGHADI TALUKA SHIRPUR DISTRICT DHULE MAHARASHTRA 425405

CHANGE NAME

I Have Change My Name
From:REKHABAI HIRALAL ISHI
To
REKHA HIRALAL KOLI
**ADDRESS** : W/O GRAMPANCHAYT KOLI WADA WAGHADI DHULE Maharashtra 425405

CHANGE NAME

I Have Change My Name From:
HIRALAL MEGHARAJ ISHI
To
HIRALAL MEGHARAJ KOLI
**ADDRESS** : W/O GRAMPANCHAYT KOLI WADA WAGHADI DHULE Maharashtra 425405

# राष्ट्रीय सिकलसेल निमिया निर्मूलन अभियान शुभारंभ

**जैताणे । प्रतिनिधी**



राष्ट्रीय सिकलसेल निमिया निर्मूलन अभियान प्राथमिक आरोग्य केंद्र जैताणे येथे शुभारंभ करण्यात आला.

याप्रसंगी भामेर ग्रुप चे पं. स. सदस्य माधुरी सोनवणे, जैताणे ग्रामपंचायत चे विद्यमान सरपंच कविता अशोक मुजगे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आला. यावेळी आलेल्या लाभार्थी ना सिकलसेल ग्रस्त व वहक रुग्णांना लाल कार्ड वाटप करण्यात आले. या प्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ आकाश गावित व डॉ गायत्री अहिरे व अन्सारी प्राथमिक आरोग्य केंद्राचे कर्मचारी कैलास शिंदे, गायकवाड नाना, सोनवणे नाना, लॅब टेक्निशियन पवार नाना, दिनेश देवरे, चौरे सिस्टर, रूपाली महिरे, अंजली डोमाळे, चव्हाण सिस्टर, वाघमोडे सिस्टर, शिपाई विजय जाधव, विकास बोरसे, सिद्धार्थ झाल्टे, रत्ना जाधव, डाटा ऑपरेटर निलेश आढावे आदी जैताणे प्राथमिक आरोग्य केंद्राचे कर्मचारी यांच्या सहकार्याने सिकलसेल टेस्ट करण्यात आले.



# प्रा.पूजा जैन यांना खान्देश उत्तर महाराष्ट्र क्रीडा रत्न पुरस्कार

**शिरपूर । प्रतिनिधी**

आर.सी.पटेल आय.एम.आर.डी.च्या प्रा. पूजा जैन यांना खान्देश उत्तर महाराष्ट्र क्रीडा रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च ण्ड डेव्हलपमेंट, शिरपूर परिसंस्थेतील क्रीडा संचालिका प्रा. पूजा जैन यांना २५ जून २०२३ रोजी नाशिक येथे पालकमंत्री ना. दादाजी भुसे व ऑलिम्पिक खेळाडू, अर्जुन पुरस्कार प्राप्त सईद रिजवी यांच्या हस्ते क्रीडा क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल उत्तर महाराष्ट्र क्रीडा रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे पालकमंत्री ना. दादाजी भुसे, सईद रिजवी, भाऊसाहेब चौधरी, हेमंत गोडसे, राजु लवटे, सुनंदा पाटील, प्रवीण तिदम, डॉ. बलवंतसिंह, आनंद खरे हे उपस्थित होते. परिसंस्थेतील क्रीडा संचालिका प्रा. पूजा जैन यांना चौथा पुरस्कार आहे. सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल माजी शिक्षणमंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव प्रभाकरराव चव्हाण, माजी कुलगुरू डॉ.के. बी. पाटील, परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील, उपसंचालक प्रा.मनोज बेहेरे, डॉ.मनोज पटेल, डॉ.तुषार पटेल, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रा. पूजा जैन यांचे कौतुक केले.

# पिंपळादेवी विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**धुळे । प्रतिनिधी**



शहरातील मोहाडी उपनगरातील श्री पिंपळादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आर. व्ही. पाटील होते. त्यांच्या हस्ते महर्षी व्यासांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. चैताली करंकाळ, दक्षता शार्दुल या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. उपमुख्याध्यापक के. आर. सावंत यांनी वेदांची उत्पत्ती, निर्मिती, वेदांमध्ये समाविष्ट असलेले विविध क्षेत्रातील ज्ञान, महर्षी व्यासांची वंशावळ, त्यांच्या साहित्यकृती, व समाजासाठी केलेले कार्य विविध उदाहरणे व गोष्टींच्या माध्यमातून विषद केले.

# बाळापुर येथे अंबिशन किड्स प्री प्रायमरी स्कूलचे पत्रकार ठाकूर, नगरसेवक पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

**धुळे । प्रतिनिधी**





तालुक्यातील बाळापुर आनंद नगर श्री.साईबाबा मंदिरासमोर अंबिशन किड्स प्री प्रायमरी स्कूलचे पत्रकार विशाल ठाकूर, नगरसेवक संजय पाटील यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी पत्रकार विशाल ठाकूर, नगरसेवक संजय पाटील यांनी पालकांना आपल्या मनोगतातून मार्गदर्शन केले.

सर्वसामान्य पालकांच्या मुलांसाठी नर्सरी ज्युनिअर केजी व सिनियर केजी ची सोय उपलब्ध करून दिल्याने या मान्यवरांनी अंबिशन किड्स प्री प्रायमरी स्कुलचे संचालक दीपक वाघ यांचे कौतुकही केले.

या शाळेच्या माध्यमातून मुलांच्या बौद्धिक क्षमतेनुसार शिक्षणाची तयारी केली जाणार आहे. या शाळेत उच्चशिक्षित अध्यापक शिक्षक असून प्रत्येक पाल्यांकडे वैयक्तिक लक्ष दिले जात असल्याने गावकऱ्यांसह प्रमुख मान्यवरांनी कौतुकही व्यक्त केले.

याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते राहुल पाटील, दिनेश पाटील, प्रा.चंद्रकला वाडीले, पत्रकार आकाश सोनवणे, गणेश सुवालाल पाटील उपस्थित होते. तसेच सोहम पाटील, विपुल पवार, प्रवीण मोरे, साईराज बैरागी, जितेंद्र पाटील, विपुल साळुंखे, गौरव बडगुजर आदींनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. नर्सरी ज्युनिअर व सिनियर केजी चे विद्यार्थ्यांसह गावातील प्रतिष्ठित नागरिक व पालक वर्ग, शिक्षक व कर्मचारीही कार्यक्रमाला उपस्थित होते.

ADMISSION शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था ADMISSION

विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade
वडेल रोड, एमएसईबीजवळ, वलवाडी, धुळे

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc | B.C.A | M.M.S./ M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्या S.Y. Bsc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क - प्रा. ललिता निकम - ८८६२०४४७९१ प्रा. जागृती पाटील - ७८८७९३४३६५

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापीठ, नाशिक, कोड नं. 5299A
B.A., B.C.A., B.Sc., M.A. M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल
संपर्क - प्रा. हर्षल पाटील - ९४२१२८३५७७ श्री. नितेश पाटील - ९९२२११६४३८
प्रा. भुषण पाटील - ७७०९१००७९८

शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. कोड नं. 2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता - बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुलॉजी, मायक्रो बायोलॉजी / बी.फार्म / बी.ए.एम.एस / बी.डी.एस. / एम.बी.बी.एस.
- संपर्क -
प्राचार्य डॉ. के. बी. पाटील ९४२२२८८५१८, सौ. शारदा पाटील - ९४२३४९६३४४
प्राचार्य. डॉ. आर.बी. पवार - ९४२०३७५७३५
प्रा. डॉ. योगेश बोरसे - ९४२३३७८९३६ श्री. हर्षल पाटील - ९४२१२८३५७७

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





मंगळवार, दि. ४ जुलै २०२३

# स्वामी समर्थ केंद्रात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी














धुळे।
शहरातील श्री स्वामी समर्थ केंद्रांत गुरुपूजनाचा सोहळा मंगलमय वातावरणात साजरा करण्यात आला. समर्थ सेवेक-यांनी श्री स्वामी समर्थ महाराज व गुरुमाउलींचे पूजन करून त्यांचे आशीर्वाद घेतले. त्यासाठी पहाटेपासून सर्व समर्थ केंद्रांवर सेवेकरी व भाविकांनी गर्दी केली होती. धुळे शहरातील असंख्य हिंदू-मुस्लिमांचे श्रध्दास्थान असलेल्या प.पू. दंडेवालेबाबा यांच्या तपोभूमीवर गुरुपौर्णिमेनिमित्त विकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. गुरुपौर्णिमेनिमित्त सकाळी मान्यवरांच्या हस्ते आरती करण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम झाला. शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. शहरातील पंचायत समिती जवळ असलेल्या प.पु. सद्गुरु दंडेवालेबाबा यांच्या तपोभूमीवर गुरुपौर्णिमेनिमित्त दरवर्षी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. हिंदू-मुस्लिमांसह विविध धर्मियांचे श्रध्दास्थान असलेल्या या तपोभूमीवर या दिवशी भाविकांची मोठी गर्दी होत असते. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून दंडेवाले बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच मान्यवरांच्या हस्ते आरती करण्यात आली. महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिसरातील असंख्य भाविकांनी दंडेवालेबाबांचे दर्शन घेत महाप्रसादाचा लाभ घेतला. याप्रसंगी ॲड. जवाहर पाटील, गोविंददादा साखला, जितेंद्र बोरसे, जयवंत वानखेडे, सुनील खरात, राजकुमार पाटील, मधु मोरे, गजूआण्णा वाघ, श्री. लिली, मुन्ना माळी, अमोल जाधव, गटलू पाटील, तात्या कोळी, विजय चौधरी, महेंद्र कांबळे, अस्लम काकर, सुरेश पाटील, राजेंद्र पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन सद्गुरु दंडेवाले बाबा यांच्या भक्तांकडून करण्यात आले.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# अक्कलपाडा जलवाहिनीला भीषण गळती














धुळे ।अक्कलपाडा योजनेतून धुळे शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी टाकलेल्या मुख्य जलवाहिनीला काल मोठी गळती लागली. यात लाखो लीटर पाणी वाया गेले आहे. याविरोधात आज आझाद समाज पार्टीचे प्रदेश कार्याध्यक्ष आनंद लोंढे व समता समाज संघ जिल्हाध्यक्ष किरण गायकवाड यांनी गळती लागलेल्या ठिकाणी जावून सत्ताधारी भाजपाविरोधात आंदोलन केले. यावेळी 'भाजपा धुळे यांच्या फुटलेल्या वायद्याप्रमाणे पाईपलाईन देखील फुटली, धुळेकरांना एकदिवसाआड पाणी कधी?' असे बॅनर झळकावून जोरदार घोषणाबाजीही करण्यात आली. अक्कलपाडा धरणातून हनुमान टेकडी जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाणी वाहून नेणारी मुख्य जलवाहिनी अचानक फुटली. व्हॉल्व नादुरुस्त झाल्याने ही गळती झाल्याचे सांगण्यात येत आहे. या गळतीमुळे तीव्र वेगाने पाणी हवेत ओसंडले. ही गळती मोराणे जवळील प्रतापनाना महाले बाजार समितीजवळ लागली होती. त्यामुळे संपूर्ण परिसर जलमय झाला. परिणामी, सुरत-नागपूर महामार्गावरुन जाणार्या वाहनांना तारेवरची कसरत करावी लागली. पाणी गळतीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर त्या ठिकाणी आझाद समाज पार्टीचे आनंद लोंढे, समता संघाचे किरण गायकवाड, मिलिंद खैरनार आदी कार्यकर्ते दाखल झाले. त्यांनी त्याठिकाणी बीजेपीविरोधी घोषणाबाजी करुन वायद्याप्रमाणे पाईपपाईन देखील फुटली असे बॅनर झळकाविले. तसेच या आशयाची पत्रकं गळती झालेल्या ठिकाणी फेकून सत्ताधार्यांचा तीव्र निषेध केला.

संकलन : दिपक वाघ